आर.डी.क्र.२०/२०१०
हबिब खान वि. शशिधरण
नि.क्र. ३९ चा भाग

<u>उर्वरित उलटतपास धनको यांच्यातर्फे श्री एल.आर.मांडवकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>

**०६.** आता मला नि.क्र.४६ दाखविण्यात आले ती नगरभुमापण क्र.३१५१ यासंदर्भात आहे. सदर मालमत्ता ही धनजीभाई मालजीभाई पटेल यांची होती. सदर मालमत्ता ही खरेदी खतानुसार हबिबखान शेरखान पठाण यांच्या नावाने झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मालमत्ता ही धनजीभाई पटेल यांच्याकडुन खरेदी खत करून मिळावी म्हणुन मी दि.न्यायालय, उमरेड येथे दिवाणी दावा क्र.२५६/८८ हा दावा दाखल केला होता. आता मला सदर दिवाणी दावा क्र.२५६/८८ दाव्याची प्रत दाखविण्यात आली त्यावर वादी म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र.९६** देण्यात आलेले आहे. आता मला नि.क्र.९६ मधील परिच्छेद क्र.०२ मधील मिळकतीचे वर्णाबाबत मजकुर वाचुन दाखविण्यात आला तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दिवाणी दावा क्र.२५६/८८ हा खारिज झालेला आहे. आता मला दिवाणी दावा क्र.२५६/८८ मधील डिक्रीची सत्यप्रत दाखविण्यात आली. सदर डिक्रीला **नि.क्र.९७** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर नि.क्र.९७ विरूध्द मी मा. जिल्हा न्यायालयात अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिल न्यायालयाने खारिज केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर वादमिळकत ही हबिखान यांनी खरेदीखताने विकत घेतलेली आहे.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर धनको यांनी माझ्याविरूध्द दिवाणी दावा क्र.२३/२००४ हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, धनको यांनी केलेल्या दाव्याच्या मिळकतीचे वर्णन व दिवाणी दावा क्र.२५६/८८ मधील मिळकतीचे वर्णन सारखेच होते. धनको यांनी केलेल्या दाव्यामधील चतुर्सिमा बरोबर नाहीत. आता मला दिवाणी दावा क्र.२३/२००४ ची प्लेंट दाखविण्यात आली सदर प्लेंटप्रमाणे धनकोने दावा केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दावा क्र.२३/२००४ मध्ये लेखी बयाण दाखल केले होते त्यामध्ये मिळकतीच्या चतुर्सिमा याबाबत हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा क्र.२३/२००४ मध्ये दावा मंजुर झाला होता. आता मला सदर दाव्यातील डिक्रीची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.९८** देण्यात आला. हे म्हणणे खरे

आहे की, सदर डिक्री विरूध्द मी मा. जिल्हा न्यायालयात अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिल मा.जिल्हा न्यायालयाने फेटाळले होते. आता मला दिवाणी दावा क्र.२३/२००४ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली त्यास **नि.क्र.९९** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, मी जे अपिल केले होते त्याचा अपिल क्र.५४४/२०१० असा होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिलामध्ये मी दिवाणी दावा क्र.२३/२००४ मधील वदमिळकतीचे वर्णन बरोबर नाही याबाबत हरकत घेतली नव्हती. आता मला सदर अपिलाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.क्र.१००** देण्यात आला. आता मला सदर अपिलमधील न्यायनिर्णय व आदेश यांच्या प्रमाणित प्रति दाखविण्यात आल्या त्यास अनुक्रमे **नि.क्र.१०१ व १०२** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र.२३/२००४ मधील न्यायनिर्णय माझ्यावर बंधनकारक नसल्याच्या कारणावरून मी धनकोविरूध्द सन २०१५ मध्ये दिवाणी दावा क्र.१४/२०१५ हा दाखल केला होता. आता मला सदर दाव्यातील प्लेंटची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्याला **नि.क्र.१०३** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा हा नगर भू.क्र.३१५१ च्या मिळकतीबाबत होता. आता मला नि.क्र.१०३ मधील परिच्छेद क्र.०१ मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला तो खरा व बरोबर आहे. आता मला नि.क्र.१०३ मधील परिच्छेत क्र.७-अ मधील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो खरा व बरोबर नाही. नि.क्र.१०३ मधील दाव्यामध्ये मी नि.क्र.०५ दाखल केला होता तो खारिज झाला होता. मी नि.क्र.०५ वरिल आदेशाविरूध्द किरकोळ दिवाणी अपिल क्र.९२/२०१५ अन्वये अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिल खारिज झाले होते. आता मला सदर अपिलातील न्यायनिर्णयाची सत्यप्रत दाखविण्यात आली त्यास **नि.क्र.१०४** देण्यात आला.

**८.** हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र. १४/२०१५ हा दि.१२/०१/२०१८ रोजी सदर न्यायालयाने खारिज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर न्यानिर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल क्र. ९५/२०१८ अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपिल मा. जिल्हा न्यायालयाने खारिज केले होते. आता मला दिवाणी दावा क्र.१४/२०१५ मधील माझ्या मुळ दाव्याची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली त्यामधील प्रार्थनेतील प्रार्थना क्र.१ मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला

त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा हा दि.१२/०१/२०१८ रोजी खारिज झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्यातील न्यायनिर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल क्र.९५/२०१८ हे अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिल हे दि.१७ सप्टेंबर,२०१९ रोजी खारिज झाले होते. सदर अपिलातील न्यायनिर्णय व डिक्रीच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहे त्या आता मला दाखविण्यात आल्या त्यास नि. क्र. अनुक्रमे **१०५ व १०६** देण्यात आला. आता मला सदर अपिल मेमोची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली त्यास **नि.क्र.१०७** देण्यात आला.

**९.** मी सदरहु वादमिळकतीमध्ये वेल्डींगचे वर्कशॉप चालवितो. हे म्हणणे खरे नाही की, माझी दोन ते तीन हजाराची दिवसाची कमाई होते. साक्षीदार पुढे सांगतो की, महिण्याची १५,०००/-रू. कमाई होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादमिळकत जास्तीत जास्त मला वापरता यावी म्हणुन मी सदर खोटी हरकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, धनजीभाई यांच्या ताब्यामध्ये जी मिळकत होती तीच मिळकत आजरोजी माझ्या ताब्यात आहे व त्याच जागेबाबत वाद सुरू आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०६.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड